Archana Nagar Co.Op. Hsg. Society Ltd.

39/2/2, Erandwane, Pune - 411038.

Reg. No. P.N.A./H.S.G./(T.C.)/1707/1989-90 Dt. 27/10/1989

Email : archananagar.chs @gmail.com

Ref. No. 42/2026-2027

Date : 28/09/2026

प्रति,

प्रणव शेंडकर,

Deshpande Shendkar Realty LLP (D n T Properties)

पुणे ४११०३८

विषय: अर्चना नगर सहकारी गृह रचना संस्था - पुनर्विकासाचे कामाचा अहवाल सादर करण्याबाबत

संदर्भ :

१. आपले संस्थेस पाठविलेले इंग्रजी पत्र दिनांक 20 जुलै 2026

२. संस्थेच्या 36 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तान्त क्र. 2026-27/3, दिनांक 13 ऑगस्ट 2016

महोदय,

आपल्या संदर्भीय दिनांक 20 जुलै 2026 पत्राचे अनुषंगाने संस्थेने आपणा सोबत केलेल्या सामंजस्य करारास मुदतवाढ देण्याबाबत प्रस्तावाचे अनुषंगाने आपण कळविलेली पार्श्वभूमी विचारात घेऊन याबाबत मान्यता देण्यासाठी संस्थेच्या दिनांक 9 ऑगस्ट 2026 रोजी झालेल्या 36 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सदर विषय सभागृहाच्या विचारार्थ मांडण्यात आला होता. सभागृहाने काही अटी व शर्तींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास बहुमताने मान्यता दिली आहे. सदर सभेचा इतिवृत्तान्त संदर्भीय दिनांक 13 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यानुसार याबाबत आपण केलेल्या कामाचा दर दोन महिन्यांचा प्रगती अहवाल आपण संस्थेस सादर करून कार्यकारी समितीने तो सभासदांना निदर्शनास आणायचा आहे.

सद्यस्थितीत आढावा घेतला असता असे लक्षात येते की, आपण संस्थेस पाठवलेले संदर्भीय दिनांक 20 जुलै 2026 पत्र व आपल्या वतीने ॲड. जाधव यांनी संस्थेस पाठविलेले दिनांक 3 ऑगस्ट 2026 पत्र या पार्श्वभूमीवर मुदत वाढीच्या प्रस्तावाचा विचार करण्यात आला होता. तथापि, तदनंतर याप्रकरणी आत्तापर्यंत पुढे काय प्रगती झाली व कोणत्या स्तरावर काम पोहोचले आहे? हे संस्थेस आपण कळविणे अपेक्षित होते. अद्याप याबाबत आपणाकडून पुढील केलेल्या / प्रस्तावित कार्यवाहीबाबत संस्थेस काहीही कळविण्यात आलेले नाही. संस्थेतील सदस्यांना कामाच्या प्रगतीचा आढावा वेळोवेळी सादर करणे आवश्यक असल्याने याप्रकरणी आपण मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केल्यानंतर पुढे काय प्रगती झाली याचा सविस्तर तपशील कृपया संस्थेस कळवावा. तसेच, याबाबत आपल्या पुढील कामाचे महिना निहाय नियोजन काय राहील? याचा तपशील कळवावा. वास्तविक, ही आपल्या संस्थेची

जबाबदारी असल्याने यापुढे दर महिन्याला कामाच्या प्रगतीचा अहवाल संस्थेस पाठवण्याची व्यवस्था केल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन. यापुढे प्रगती अहवाल पाठविण्याबाबत स्मरणपत्र देण्याची वेळ येवू नये अशी अपेक्षा बाळगतो.

आपला

प्रशांत भोसले

अध्यक्ष

PVShendkar
29/09/2026

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०
पुणे-४११०३८

DESHPANDE SHENDKAR REALTY LLP
PUNE